VOL- VII ISSUE- X OCTOBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# स्थलांतर समस्या : ग्रामीण विकासातील एक अडसर

**सौ. प्रतिभा खंडेराव कोतवाल**
एम्.एस्सी., बी. एड. पदवीधर शिक्षिका
सदगुरु भालचंद्र महाराज विद्यालय
जि.प. शाळा कणकवली क्र.३. ता. कणकवली
जि. सिंधुदुर्ग–४१६६०२ (महाराष्ट्र)

**प्रास्ताविक**

स्थलांतर ही प्रक्रिया मानवाला नवीन नाही. प्राचीन काळापासून मानव स्थलांतर करत आला आहे. अगदी मानवाच्या उत्क्रांतीपासून स्थलांतराला सुरुवात झाली आहे. आदी मानव जंगलात राहत असे. शिकार करणे, कंदमुळे गोळा करणे यासाठी तो जंगलात भटकत असे. त्यानंतर शेती करणे, मासेमारी करणे यासाठी तो नदीकाठी स्थिरावला. सुपिक जमिनीमध्ये तो शेती करुन उदरनिर्वाह करु लागला. झाडाच्या फांदया, माती, दगड इ. सहाय्याने तो घरे तयार करुन त्यामध्ये राहू लागला. जंगलातील हिस्त्र श्वापदांपासून संरक्षण मिळावे म्हणून त्याने एकमेकांच्या जवळ घरे बांधून एकत्र राहू लागला. त्याचे रुपांतर खेडयात झाले. शेती, व्यवसाय, व्यापार या निमित्ताने तो एका खेडयातून दुसऱ्या खेडयात वास्तव्यासाठी गेला. घरात हाताच्या सहाय्याने बनविलेल्या वस्तू विक्री करण्यासाठी तो इतर खेडयांमध्ये जाऊ लागला. खेडयांचे विकसित स्वरुप म्हणजेच शहरे होय. खेडयातील लोकांना तेव्हापासून शहरांचे आकर्षण वाटत असे. पूर्वीच्या काळी झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठया प्रमाणात स्थलांतरे झालेली आढळतात. उदा. पूर, दुष्काळ, चक्री, वादळे, भूकंप, ज्वालामुखी, वीज, आग लावणे, इ. तसेच युध्द, महायुध्द, दहशतवाद, संघर्ष, वसाहतवाद इ. मुळे स्थलांतर वाढले. औद्योगिक क्रांतीमुळे पाश्चिमात्य देशात जाणाऱ्या स्थलांतरीतांच्या संख्येत वाढ झाली. भारत हा कृषीप्रधान देश आहे. तंत्रज्ञानामुळे देशात हरितक्रांती झाली आहे. धवलक्रांती झाली परंतु खेडयाकडून शहराकडे स्थलांतरीत होणाऱ्या लोकांचा प्रवाह काही कमी झालेला नाही. २१ व्या शतकात जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, संगणकीकरण इ. मुळे शहरातील उद्योग धंदयांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे खेडयातील लोक शहराकडे धाव घेतात तर शहरातील लोक विकसित देशात स्थलांतरीत होत आहेत. जागतिक पातळीवर आतापर्यंत जगाच्या लोकसंख्येच्या ३०%लोक स्थलांतरीत आहेत.

**व्याख्या :**

उदरनिर्वाह, व्यापार, उद्योग, व्यवसाय, नोकरी यानिमित्ताने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वास्तव्य करणे म्हणजे स्थलांतर होय.

**स्थलांतराची कारणे :–**

**१) भौगोलिक :–**

ज्याठिकाणी नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. त्याठिकाणी रोजगार उपलब्ध होतात. उदा. खाणी असलेल्या डोंगराळ प्रदेशात खाण कामगारांच्या वस्त्या आढळतात. वनसंपदा, जंगलात मिळणाऱ्या वस्तू गोळा करण्यासाठी आदीवासी लोक जंगलात राहतात. नदीकाठच्या प्रदेशात ऊस पिकाच्या परिसरात ऊस तोडणी करण्यासाठी हंगामामध्ये ऊसकामगारांचे तांडे वस्ती करतात. हायवे, पूल, प्राधीकरण, इमारतींची बांधकामे ज्याठिकाणी चालतात त्याठिकाणी बेळगाव, कर्नाटक येथील 'लमाणी' लोक तात्पुरते (हंगामी) वास्तव्य करतात. एक काम पूर्ण झाल्यावर दुसऱ्या ठिकाणी जाऊन पुन्हा तात्पुरते वास्तव्य करतात.

**२) नैसर्गिक आपत्ती :–**

अवर्षण, अतिवर्षण यामुळे दुष्काळ व पूर परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे तेथील लोकांना उदरनिर्वाहासाठी इतर ठिकाणी स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नसतो. उदा. उत्तर प्रदेशातील पूर, पश्चिम बंगाल येथे झालेले चक्रीवादळ, कोयना, तिलरी व राजस्थान इ. ठिकाणी झालेले भूकंप, बीड, लातूर, उस्मानाबाद येथील दुष्काळ, त्सुनामी लाटेचा तडाखा समुद्रकाठच्या १४ देशातील लोकांना सहन करावा लागला. अपघात, वीज,

दरड कोसळणे, ज्वालामुखी अशा घटना वारंवार घडत असतात.

**३) आर्थिक :–**

आर्थिक प्रेरणा, पैशाच्या गरजा भागविणे, गरिबी व दारिद्र्यातून मार्ग काढणे यासाठी लोक स्थलांतर करतात. रोजगार व व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतरात वाढ होते. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल येथील 'भैय्या' लोक कमी शिकलेले असतात. त्यामुळे त्यांना नोकरी मिळत नाही परंतु ते मुंबई, पुणे, दिल्ली, कलकत्ता, बंगलुरु, चेन्नई इ. शहरांमध्ये जाऊन लहान लहान व्यवसाय करतात. तसेच ग्रामीण भागातील लोक उदरनिर्वाहासाठी शहरात जातात. शहरात वेतनाचे दर अधिक असल्यामुळे तेथे लोक गर्दी करतात. ज्यांच्याकडे उच्च शिक्षण व चांगले कौशल्ये आहे असे लोक विदेशात नोकऱ्या करतात तेथे त्यांना चांगले वेतन किंवा मोठी पॅकेज मिळतात तेथे ते स्थिरावतात.

**४) शिक्षण व उच्च शिक्षण :–**

खेडयातील लोक मुलांच्या शिक्षणासाठी शहरात स्थिरावतात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लोक मुंबई, पुणे येथे गर्दी करतात. संगणक, माहिती व तंत्रज्ञान विकसित झाल्यामुळे पुणे, मुंबई व बंगलुरु येथे विद्यार्थी संख्या मोठया प्रमाणात वाढली आहे. हे विद्यार्थी आय. टी. पार्क असलेल्या शहरात नोकरीच्या निमित्ताने स्थलांतरित होतात. शहरातील लोक आपल्या मुलांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील ऑक्सफोर्ड, हावर्ड, बर्कले इ. विद्यापीठात शिक्षणासाठी पाठवितात. हे विद्यार्थी तेथे नोकरीच्या निमित्ताने वास्तव्य करतात. उदा. अमेरिका, जपान, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, कॅलिफोर्निया इ. देशात भारतातील लोक स्थलांतरीत झाले आहेत.

**५) चांगले राहणीमान :–**

देशात स्थलांतर करणाऱ्या माणसांना शहराचे आकर्षण असते तर विदेशात स्थलांतर करणाऱ्या माणसांना पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण असते. शहरांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध असतात. उदा. प्रवास, पर्यटन, हॉटेल, आरोग्य, शिक्षण, वीज, पाणी, बंगले, वस्तू व सेवांची उपलब्धता इ. मुळे खेडयातील लोक शहराकडे धाव घेतात. कोकणातील लोक मुंबईतील कापड गिरण्यात नोकरीच्या निमित्ताने तेथे स्थिरावले. कापड गिरण्या बंद झाल्या परंतु लोकांना शहराचे आकर्षण असल्यामुळे ते तेथेच राहिले आहेत. अजूनही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लोक जीवाची मुंबई करण्यासाठी मुंबईकडे धाव घेतात. शहराकडे जाण्याची मानसिकता तयार झाली आहे. शहरात फिरणे, खाणे–पिणे, मौजमजा करणे, चित्रपट पाहणे, केशभूषा, वेशभूषा, संज्ञापन, करमणूक, करिअर करणे, नशीब आजमावणे इ. चा माणसांवर शहरी स्थलांतराबाबत परिणाम झाला आहे. शहरामध्ये संस्कृती विकसित झालेली असते. चांगल्या वातावरणाचा तेथील माणसांना लाभ होतो. मुलांना उच्च शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध होतात. देशातील मुंबई, पुणे, दिल्ली, कलकत्ता व बंगलुरु इ. पाच मोठी शहरे आहेत. चांगल्या राहणीमानासाठी जगातील लोक या शहरात स्थिरावले आहेत.

**६) सामाजिक व सांस्कृतिक :–**

पुणे शहरामध्ये शैक्षणिक सुविधा चांगल्या आहेत. तेथील हवामान पोषक आहे. मुंबईमध्ये नोकरी व व्यवसायासाठी संधी आहेत. दुबई, कॅनडा, अमेरिका, जपान, जर्मनी, ऑस्ट्रेलिया इ. ठिकाणी वेतन अधिक मिळते. विकसित शहरातील व विकसित देशातील राहणीमान दर्जेदार असते. त्याठिकाणी लोक कायमस्वरुपी वास्तव्य करण्याचा निर्णय घेतात. १९४२ ते १९६० या कालावधीत भारतातील लोक दक्षिण आफ्रिकेत स्थलांतरीत झाले आहेत. चांगल्या समाजामुळे सामाजिक व सांस्कृतिक विकास होतो. राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते. तसेच जातीयता, बहिष्कार, भाषावाद, प्रांतीयवाद, धार्मिक विटंबना, छळ, भूमिहीन होणे इ. बाबी स्थलांतरास चालना देणाऱ्या आहेत. विवाहामुळे महिलांचे स्थलांतर होते. एक पुरुष नोकरीच्या निमित्ताने शहरात गेला तर त्याचे पूर्ण कुटुंब शहरामध्ये स्थलांतर करते.

**७) राजकीय घटक :–**

राजकीय हितासाठी रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन वसाहती उभारणे, झोपडपट्टया उध्वस्त करुन त्याठिकाणी मोठया इमारती बांधणे, औद्योगिक विकास, निवासी घरे बांधणे, डोंगरावर अतिक्रमण करुन बांधकामे करणे, रस्त्यांचे रुंदीकरण, नवीन वसाहती उभारणे इ. प्रकल्प राबविले जातात. अशा नवीन ठिकाणी लोक स्थलांतरीत होतात. १९४० मध्ये जर्मनीमध्ये हुकूमशाही आली. १९८० मध्ये श्रीलंकेमध्ये यादवी युध्द झाले. भारत – पाकिस्तान फाळणी

झाली. पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनीचे एकत्रीकरण झाले त्यामुळे मोठया संख्येने स्थलांतरे झाली.

**८) शासकीय योजनांचा लाभ :—**

ग्रामीण भागात धरण, कालवे, रस्ते, पुनर्वसन, रस्ता रुंदीकरण, रेल्वे मार्ग, वृक्ष लागवड, रोजगार हमी, मोबाईलचे टॉवर व इंटरनेटचा पुरवठा अशा शासकीय योजना सुरु करुन लोकांना रोजगार दिला जातो. अशा प्रकल्पांना जमिनी देणाऱ्या भूधारकाचे पुनर्वसन करावे लागते. नैसर्गिक आपत्ती प्रसंगी आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन करावे लागते. अतिवृष्टीमुळे नदी, समुद्र काठच्या लोकांना पूराचा, लाटांचा धोका पोहचतो. धरणाखालच्या गावांना पूरप्रसंगी इतरत्र जाण्याचा इशारा दिला जातो. कायमस्वरुपी धोके असलेल्या परिसरातील लोक इतरत्र वास्तव्य करण्याचा निर्णय घेतात.

**स्थलांतराचे परिणाम :—**

**अ) सकारात्मक परिणाम :—**

**१) शहराचा विकास झपाटयाने होतो.**

शहरातील लोकसंख्या वाढल्यामुळे तेथे आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. उद्योगधंदे व व्यापार वाढीस लागतो. बाजारपेठांना चालना मिळते, गुंतवणूक वाढते त्यामुळे मालमत्ता वाढीस लागतात. रोजगार व व्यवसाय वृदधीमुळे लोकांचे उत्पन्न वाढते. त्यामुळे ते अधिक रक्कमेने खरेदी करतात. त्याचा परिणाम म्हणजे विपणनाला चालना मिळते. व्यापार व विपणन वृद्धीमुळे शहरातील चलन फिरत राहते. त्याद्वारे शहरांचा विकास होतो.

**२) स्वयंरोजगार व रोजगार वृद्धी होते.**

वाढत्या लोकसंख्येमुळे शहरात नवीन नवीन व्यवसाय सुरु केले जातात. लोकांच्या गरजा वाढल्यामुळे उत्पादनात वाढ करावी लागते. त्यामुळे औद्योगिक कारखान्यात लोकांना रोजगार मिळतो. तर अनेक लोक बाजारपेठात वस्तू विक्रीचे काम करतात. त्यामुळे स्वयंरोजगार निर्माण होतात. शहरात कुशल व अकुशल लोकांना काम मिळते.

**३) ग्रामीण भागात पर्यावरण चांगले राहते.**

स्थलांतरामुळे ग्रामीण भागातील लोकसंख्या मर्यादित झाली आहे. त्यामुळे तेथे नैसर्गिक साधनसामग्री लोकांना पुरेशी ठरते. शहरातील उद्योगांमध्ये तयार होणाऱ्या वस्तू ग्रामीण बाजारपेठात पाठविल्या जातात. ग्रामीण भागामध्ये शुध्द पाणी आणि शुध्द आहार मिळतो. त्यामुळे शहरातील माणसांच्या तुलनेत ग्रामीण भागातील लोकांना चांगले आरोग्य लाभते. त्यांचे आयुर्मान वाढते.

**४) आर्थिक विकासाला चालना मिळते.**

लोकांना स्थलांतरामुळे स्वयंरोजगार व रोजगार मिळतो. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते. उद्योगांची वाढ झाल्यामुळे उत्पादन वाढते. लोकांच्या गरजा पूर्ण करता येतात. लोकांच्या राहणीमानात सुधारणा होते. देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढले तरच देशाचा आर्थिक विकास होतो. विदेशीय स्थलांतर केल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

**ब) नकारात्मक परिणाम :—**

**१) शहरातील लोकसंख्येची घनता वाढते.**

स्थलांतरामुळे शहरातील लोकसंख्या वाढते. मोठया शहरांवर अतिरिक्त लोकसंख्येचा ताण आला आहे. लोकांची प्रवासातील गर्दी, वाहनांची वाढलेली संख्या, कारखान्यातील धूर, विषारी वायू, दूषित हवा, पाणी, गलिच्छ झोपडपट्ट्या, सांडपाण्याचा निचरा नाही, आग, पूर, भूकंप, भूस्खलन इ. मुळे शहरात साथीचे रोग पसरतात. प्रदूषण वाढते. प्रदूषणाचा मानवी जीवनावर परिणाम होतो. प्रदूषणामुळे शहरातील लोकांचे सरासरी आयुर्मान कमी झाले आहे. शहरामध्ये गुन्हेगारी, दहशतवाद, बॉम्बस्फोट, खून, दरोडे, धमक्या देणे, खंडणी गोळा करणे इ. प्रकार वाढले आहेत.

**२) पायाभूत सुविधांचा तुटवडा भासतो.**

शहरातील लोकसंख्या अतिरिक्त झाल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला लागणाऱ्या गरजा पुरविणे शासनाला शक्य होत नाही. लोकसंख्येच्या तुलनेत पायाभूत सुविधा पुरेशा ठरत नाही. उदा. संरक्षण, शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी, करमणूक, प्रवास इ. त्यामुळे शहरांतील माणसांचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. अस्वच्छतेचे प्रमाण वाढले आहे. लोकांना वस्तू व सेवांचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व वेळेवर केला जात नाही. अकुशल कामगारांना रोजगार न मिळाल्यास त्यांची उपासमार होते. अतिरिक्त लोकसंख्येला पुरेशा प्रमाणात सुविधा पुरविणे शासनाला शक्य होत नाही.

**३) महागाईमध्ये वाढ होते.**

शहरातील स्थलांतरीतांची संख्या वाढल्यामुळे उत्पादित वस्तुंच्या पुरवठयापेक्षा मागणीत वाढ होते. लोकांच्या गरजा वाढतात. त्यामुळे वस्तुंच्या किमती वाढतात. शहरामध्ये खाजगी ठेकेदार अकुशल व निरक्षर कामगारांचे आर्थिक शोषण करतात. वाढत्या किंमती व वाजवी वेतन यामुळे त्यांना शहरांमध्ये राहून उदरनिर्वाह करण्याची समस्या निर्माण होते. शहरात महागाई वाढली तर ग्रामीण भागात सुध्दा महागाई वाढते.

**४) शहरातील झोपडपट्टयांमध्ये वाढ होते.**

शहरामध्ये लोकांना काम मिळते परंतु राहण्याची सोय नसते. शहरांपासून दूर अंतरावर राहून प्रवार करणे आर्थिकदृष्टया परवडत नाही. शहरात झोपडपट्टयांचे प्रमाण वाढले आहे. गलिच्छ वातावरणात लोकांच्या आरोग्याची समस्या निमाण होते. झोपडपट्टयांच्या परिसरात सुरक्षिततेचा अभाव, संस्कृतीचा ऱ्हास, आरोग्य, शिक्षण, आयुर्मान इ. समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा घसरत चालला आहे. शहरात अनधिकृत घरांची संख्या वाढत आहे.

**५) ग्रामीण भागाचा विकास खुंटतो.**

स्थलांतरामुळे शेतीची अवस्था दयणीय झाली आहे. शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा अवलंब केल्यामुळे , हस्तउद्योग व बलुतेदार पध्दतीचा ऱ्हास झाल्यामुळे ग्रामीण बेकारी वाढली आहे. शेतीवर काम करणे कमी प्रतिष्ठेचे मानले जाते. सुशिक्षित व पदवीधर शेती करायला नकार देतात. ग्रामीण भागातील लोक नोकरी, व्यवसाय, मुलांचे शिक्षण, शहराचे आकर्षण, राहणीमान इ. कारणांमुहे शहराकडे धाव घेत आहेत. त्यामुळे त्यांचे शेतीकडे दुर्लक्ष झाले आहे. कर्ती लोकसंख्या शहरात गेल्यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. शेतात काम करायला मजूर मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. शेती आर्थिकदृष्टया परवडत नाही. हंगामात चांगले उत्पादन होते पण मालाला वाजवी दर मिळत नाही. त्यामुळे शेती व्यवसाय तोटयात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाचा लवकर विकास होणे कठिण आहे. ग्रामीण भागातील कर्ते पुरुष काम व धंदयाच्या निमित्ताने शहरात जातात. त्यामुळे ग्रामीण भागात महिला, लहान मुले व वृध्द माणसे, सेवानिवृत्त लोक इ. राहतात. नाकर्त्या लोकांकडून शेती विकासांची अपेक्षा करता येणार नाही.

**६) पर्यावरणाचा ऱ्हास होतो.**

शहरामध्ये झाडांची संख्या भरपूर होती. परंतु लोकसंख्या वाढल्यामुळे रस्त्याचे रुंदीकरण, नवीन बांधकामांना परवानगी, डोंगरावर बांधकामे, समुद्रात उड्डाणपूलाचे बांधकाम इ. करताना झाडे तोडली जातात. त्यामुळे मानव संकटात सापडला आहे. पशूपक्ष्यांचे निवारे धोक्यात आले आहेत. हवा, पाणी आणि अन्न दूषित झाले आहे. प्रदूषणात वाढ झाली आहे. वेगवेगळया प्रकारचे आजार, साथीचे रोग, शहरांपासून ग्रामीण भागाकडे येतात. प्रदूषण ही जागतिक समस्या बनली आहे. निसर्गाचा समतोल बिघडल्यामुळे मानवाचे आरोग्य धोक्यात आले आहे.

**उपाययोजना :—**

स्थलांतर या समस्येची तीव्रता कमी करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना व शासकीय पातळीवर ठोस धोरणे ठरविण्याची व त्याची कार्य तत्परतेने अंमलबजावणी करण्याची गरज आहे. त्यासाठी अभ्यासकाने पुढील उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

**१) खेडी स्वयंपूर्ण बनविणे :—**

खेडयांचा विकास झाल्याशिवाय खेडी स्वयंपूर्ण होणार नाहीत. त्यासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या कच्च्या मालावर आधारित उत्पादन करता येणारे लघुउद्योग सुरु केले पाहिजेत. सुशिक्षित बेरोजगारांना अशा व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार व रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. म्हणजे युवक ग्रामीण भागात स्थिरावतील व ग्रामीण भागाचा विकास होईल. थोर समाजसेवक अण्णा हजारे यांनी राळेंगण सिध्दी तर सरपंच पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार ही खेडी स्वयंपूर्ण बनवली आहेत. त्यामुळे तेथील लोकांना गावात रोजगार उपलब्ध झाला असून एकही माणूस बेकार नाही.

**२) पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे :—**

ग्रामीण भागातील दळणवळण विकसित करण्यासाठी शासनाने तेथील पायाभूत सुविधांकडे लक्ष देण्याची गरज आहे. उदा. रस्ते, आरोग्य, शिक्षण, करमणूक, वीज, पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, बॅंका, बाजारपेठा, संग्रहण सुविधा, माल खरेदी विक्री केंद्र, प्रमाणीकरण व

प्रतवारी, माहिती प्रसारण, संकरीत बी.बियाणांची उपलब्धता, शेती मालाला हमी भाग इ. ची गरज आहे.शेती किफायतशीर झाली तरच शेतकरी शेतीकडे आकर्षित होतील. युवक शहराऐवजी ग्रामीण भागात स्थिरावतील.

**३) शेतीपूरक उद्योगांचा विकास करणे:—**

शेतीला जोडधंदे असल्याशिवाय शेती परवडत नाही. शेतकऱ्यांनी अन्नधान्यांच्या जोडीला नगदी पिके घेणे, बाजारभाव पाहून पिके घेणे, डेअरी, पोल्ट्री, ग्रीन हाऊस, फळबागायत, फळ प्रक्रिया इ. पूरक व्यवसाय सुरु केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ होईल. नवीन उद्योग व व्यवसायांचे युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील कौशल्ये विकसित करता येतील. ग्रामीण पर्यटनाला आता चांगला वाव आहे. युवकांनी व्यवसायांचे प्रशिक्षण घेऊन ग्रामीण भागात व्यवसाय सुरु केले पाहिजेत. त्यामुळे ग्रामीण औद्योगिकीकरणाला चालना मिळेल. त्याद्वारे ग्रामीण भागाचा विकास करता येईल.

**४) आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे :—**

पारंपारिक पध्दतीने शेती करण्यापेक्षा ती आधुनिक पध्दतीने केली तर ती परवडेल. त्यासाठीशेतकऱ्यांनी संकरित बी—बियाणे, शेतीसाठी लागणारी अवजारे, आधुनिक उपकरणे, सिंचन सुविधा (ठिबक सिंचन), पॉवर ट्रीलर, ग्रीन हाऊस, मोटार इंजिन, पेरणी यंत्र, मळणी यंत्र इ.चा अवलंब केला पाहिजे. ही उपकरणे खरेदीसाठी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला पाहिजे. त्यासाठी सबसिडी, कर्ज सुविधा, वाजवी व्याजदर इ. चा फायदा घेता येईल. सेंद्रिय खताचा वापर, कुटुंबातील माणसांच्या मदतीने शेती केल्यास खर्च वाजवी येतो व शेती परवडते. शेतीसाठी बैल वापरणे आता परवडत नाही.

**५) मानसिकता बदलणे :—**

या जगात कोणतीही गोष्ट मोफत मिळत नाही. कष्टाला पर्याय नाही. शहरात जाऊन राहण्यासारखी आज स्थिती नाही. म्हणून ग्रामीण भागातील लोक व युवकांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. आपल्या गावाकडील घर, जमीन व इतर मालमत्तांचे संरक्षण केले पाहिजे. आपल्या गावात राहून शेतीबरोबर एखादा लहानसा व्यवसाय सुरु केला तरी नोकरी इतपत उत्पन्न मिळेल. शहरात जाऊन आरोग्य बिघडवून घेण्यापेक्षा ग्रामीण भागातील पोषक वातावरणाचा लाभ घेता येईल. ग्रामीण संस्कृती, परंपरा टिकविण्याची जबाबदारी येथील माणसांची व युवकांची आहे. पैशासाठी व मौजमजा करण्यासाठी शहरांकडे धावण्याचे आता थांबविले पाहिजे. ग्रामीण भागात राहून ग्रामीण विकासाला हातभार लावणारी माणसे व युवकांची आपल्या देशाला गरज आहे.

**६) विविध घटकांचे सहकार्य अपेक्षित आहे :—**

स्थलांतर ही एक सामाजिक आणि जागतिक समस्या बनली आहे. दिवसेंदिवस स्थलांतरीतांच्या संख्येत वाढ होत आहे. ग्रामीण भागातील लोकसंख्या कमी होत आहे तर शहरातील लोकसंख्या फुगत चालली आहे. शहरांचा विकास होत आहे तर ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे खेडी व शहरे यामध्ये स्थलांतरामुळे दरी निर्माण झाली आहे. म्हणून ग्रामीण भागातील राजकीय पुढाऱ्यांनी येथील भागाचा विकास करता येईल असे प्रकल्प सुरु केले पाहिजेत. शासनाने अशा प्रकल्पांना प्राधान्य देऊन आर्थिक सहाय्य केले पाहिजे. तसेच प्रत्येक गावातील माणसांनी व युवकांनी आपल्या गावाचा विकास करण्यासाठी खारोटीचा सहभाग दिला पाहिजे. युवकांनी मी माझ्या गावात राहून माझ्या गावाचा विकास करीन अशी प्रतिज्ञा केली पाहिजे.

**निष्कर्ष :—**

स्थलांतर मानवाच्या हिताचे असले तरी स्थलांतरामुळे वाढणाऱ्या समस्या व परिणाम गंभीर स्वरुपाचे आहेत. ग्रामीण भागातील लोक शहरामध्ये स्थलांतरीत झाल्यामुळे ग्रामीण भागातील घरांना कुलपे लावलेली दिसतात. कोकणात ही परिस्थिती अधिक प्रमाणात जाणवते. मराठी शाळेतील पटसंख्या वेगाने घटत आहे त्याचा परिणाम हायस्कूल व महाविद्यालयांवर झाला आहे. शेती आर्थिकदृष्टया परवडत नाही म्हणून लोक शेती पडीक ठेऊन शहराकडे धाव घेत आहेत. शेती उद्योग हा औद्योगिकरणाचा पाया आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष केले तर देशाचा औद्योगिक विकास, आर्थिक विकास करणे त्यामुळे वाढ करणे शक्य होणार नाही. भारतासारख्या कृषिप्रधान देशाची अवस्था बिकट होईल. ग्रामीण संस्कृतीचा ऱ्हास झाला तर देशाची संस्कृती ढासाळायला वेळ लागणार नाही.

स्थलांतर समस्येवर शासकीय पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. राष्ट्रपिता म. गांधींचे स्वप्न होते.

'खेडयांकडे चला' तरच ग्रामीण भागाचा पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होईल. पण आज ग्रामीण भागातील लोक प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने शहरांकडे धावत सुटले आहे. ग्रामीण संस्कृतीची जोपासना करायची असेल तर ग्रामीण विकासाचे प्रयोग व योजना प्रत्येक गावात राबविल्या पाहिजेत. शासनाने ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीक्षम उद्योग उभारले पाहिजेत. सरकारी संस्था संख्येने स्थापन केल्या पाहिजेत. शेती उत्पादनाला रास्त व नियंत्रित दर दिल्यास शेतकरी राजा सुखी होईल. ग्रामीण भागातील बाजारपेठा संघटित केल्या तर लोकांना शहरांप्रमाणे ग्रामीण भागात सर्व सुविधा उपलब्ध होतील. तरच ते स्थलांतर न करता ग्रामीण भागात स्थिरावतील.

स्थलांतराशिवाय विकास नाही हे आपल्याला पटत असले तरी ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आपण शहरीकरणाचा त्याग केला पाहिजे. एकाच नाण्याला दोन बाजू असतात ज्याप्रमाणे स्थलांतर फायदयाचे आहे तसे तोटयाचे सुध्दा आहे. त्यासाठी शहरे व ग्रामीण भाग यामध्ये समन्वय घडवून आणण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासन, समाज, समाजसेवक, लोकप्रतिनिधी इ. नी एकत्र येऊन या समस्येवर विचारविनीमय केला तरच या समस्येची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

**संदर्भ**

१) दास्ताने संतोष, असा हा महाराष्ट्र, हिमालया पब्लिकेशन हाऊस, मुंबई २०१७
२) दास्ताने संतोष, असा हा भारत, हिमालया पब्लिकेशन हाऊस, मुंबई २०१७
३) देसाई व भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे २०१३
४) गोरे अशोक, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४
५) शिंदे एस. बी. मानवी भूगोल, सेठ पब्लिशर्स, मुंबई २०१०
६) अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, मुंबई
७) योजना, महाराष्ट्र शासन, मुंबई
८) लोकराज्य, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई
९) www.google.com
१०) www.shodhganga .co
११) www.wikipedia.com